(१३२)

अतित्वर्य/महत्वाचे

करआकारणी व करसंकलन कार्यालय
पुणे महानगरपालिका.
जा.क्र. TAC/१०८९
दिनांक. ७.७.०८

मा. सर्व क्षेत्रीय अधिकारी
पुणे महानगरपालिका.

विषय: कर आकारणी न झालेल्या मिळकतींची कर आकारणी, वापरातील बदल, तसेच अतिरिक्त बांधकाम, अशा मिळकतींची कर आकारणी करुन मिळकतकर वसूली करणेबाबत अभय योजनेबाबत(ॲम्नेस्टी स्कीम).

संदर्भ : मा. महापालिका आयुक्त यांचे आदेश व मान्यता ठराव क्र ६/१४३ दिनांक १८.६.२००८.

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकतींच्या करआकारणीबाबत सोबत जोडल्याप्रमाणे अभय योजना (ॲम्नेस्टी स्कीम) राबविण्याबाबत मा. महापालिका आयुक्त यांनी वरील संदर्भान्वये मान्यता दिली असून सदर अभय योजना (ॲम्नेस्टी स्कीम) दिनांक १५.७.२००८ ते १५.८.२००८ अखेर राबविण्यात येत आहे.

कर आकारणी न झालेल्या मिळकतींची कर आकारणी, वापरातील बदल, तसेच अतिरिक्त बांधकाम, अशा मिळकतींची कर आकारणी करुन मिळकतकर वसूली करणेबाबत अभय योजनेची (ॲम्नेस्टी स्कीम)माहिती पुणे शहरातील सर्व नागरिकांना होण्यासाठी सोबत भीत्तीपत्रके जोडली असून क्षेत्रीय कार्यालये व क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या क्षेत्रामधील महत्वाच्या ठिकाणी लावणेबाबत आरोग्य विभागाकडील सेवकांना सुचना द्याव्यात ही विनंती.

सदर अभय योजनेबाबत मिळकतदार यांनी भरून द्यावयाचे फॉर्म/अर्ज छापून घेतले असून ते सोबत जोडले आहेत. सदर अर्ज क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत मिळकतकर आकारणी व मिळकतकर संकलन विभागप्रमुख यांना देऊन सदरचे अर्ज नागरिकांना विनामूल्य देणेबाबत व नागरिकांनी भरून दिलेले अर्ज स्विकारणेबाबत सुचना द्याव्यात.

करआकारणी व करसंकलन विभागाकडील संबंधित विभागप्रमुख यांनी असे नागरिकांनी भरून दिलेले अर्ज मुख्य कार्यालयाकडे जरूर त्या पुढील कार्यवाहीसाठी त्याच दिवशी पाठविणेबाबत दक्षता घेणेबाबत संबंधिताना आदेश द्यावेत.

सदर अभय योजनेचा जास्तीत जास्त प्रचार आपल्या स्तरावर करण्यात येऊन सदर योजनेव्दारे पुणे शहरातील करआकारणी न झालेल्या व ज्या मिळकतीच्या वापरात बदल झाला आहे अशांची करआकारणी करणेकामी सहकार्य राहील अशी आशा बाळगतो.

कळावे.

(सही) ७/७/०८
उप आयुक्त(विशेष) तथा
करआकारणी व करसंकलन प्रमुख
पुणे महानगरपालिका.

सोबत : वरीलप्रमाणे
प्रत.
सर्व मा. उप आयुक्त( क्षेत्रीय कार्यालय १,२,३,४)
पुणे महानगरपालिका.
यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.
सर्व सहा. करआकारणी व करसंकलन प्रमुख
सर्व विभागप्रमुख = क्षेत्रीय कार्यालय, संपर्क कार्यालय.
यांना पुढील कार्यवाहीसाठीः